नेमणूक मान्यता आदेश

603

जा.क्र./जिपजा/शिक्षण/प्रा-6/200

कार्यालय जिल्हा परिषद, जालना.

दिनांक : 7/7/09

प्रति,

अध्यक्ष / सचिव (मुख्याध्यापक)

मत्स्योदरी उर्दू प्राथमिक शाळा, कुंभारपिंपळगाव

**विषय : कर्मचारी नेमणूकीस वैयक्तिक मान्यता देणे बाबत.** (सेवासातत्य)

संदर्भ : आपले कार्यालयीन पत्र क्र. दिनांक :

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावास अनुसरुन शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमाच्या, तसेच खालील दर्शविलेल्या अटींच्या अधीन राहून वैयक्तिक मान्यता देण्यात येत आहे.

1. आपल्या शाळेतील सर्व वर्ग / तुकड्या अनुदान प्राप्त असून त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांच्या संख्येस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वेतनाची जबाबदारी शाळेवर / संस्थेवर राहील.
2. कर्मचारी अनुसूची मंजूरी आदेशात विहित केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात आलेले आहे.
3. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विहित घड्याळी केलेल्या तासिके प्रमाणे पूर्ण वेळ सेवा करीत आहे.
4. महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम 1981 च्या क्रमांक 7 अन्वये ) आवश्यकते मागासवर्गीयांचे प्रमाण राखलेले असून मागासवर्गीय कर्मचारी यांच्या नेमणूका करण्याबाबतची कार्यवाही नियम क्र.8 व 9 अन्वये पूर्ण करण्यात आलेली आहे.
5. व्यवस्थापनाने केलेल्या नेमणूका या महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम 1981च्या अनुसूची ब ) मध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुसूची क मध्ये दिलेल्या वेतनश्रेणीनुसारच) उपलब्ध पदांच्या अधीन राहून करण्यात आलेले आहे.
6. या कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षक आपणांकडे सामावून घेण्यासाठी पाठविल्यास व त्यानुसार ते अतिरिक्त म्हणून नेमले गेल्यास नेमणूक दिलेल्या शिक्षकास 24 तासाची नोटीस देवून कमी करण्यात येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी. व समज मिळाल्याबद्दलची त्यांची स्वाक्षरी आपल्या दफ्तरी ठेवावी.
7. सन — वर्षात जादा मिळालेल्या तुकड्यांसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थीक तरतूद उपलब्ध करून दिल्यासच वेतन अदा केले जाईल. सदरील जादा तुकड्या अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची देयके सादर करावीत.

शेक्षणिक वर्ष.......२००८-२००९.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव व पदनाम | शेक्षणिक / व्यवसायीक पात्रता | मान्यकेलेली वेतनश्रेणी | नेमणूक दिनांक व मान्यतेचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| १] | रिजवानखाँन युनुसखाँन पठाण | एचएससी डी.एड. | ४५००-७००० | दि. १३/९/२००३ ते १२/९/२००६ पर्यंतचा शि.से. कालावधी संपल्याने दि. १३/९/२००६ पासून सेवासातत्य देण्यात येते. विनाअनुदान तत्वावर. |
| २] | श्रीमती आफरीनबानो गुलाम नासेर | एस.एस.सी. डी.एड. | -"- | दि. २८/८/२००१ ते २७/८/२००४ पर्यंतचा शि.से. कालावधी संपल्याने दि. २८/८/२००४ पासून वि.अ. तत्वावर सेवासातत्य देण्यात येते. |
| ३] | अ. रज्जाक अ. सत्तार | एच.एस.सी. डी.एड. | -"- | १२/८/२००२ ते ११/८/०५ शि.से. कालावधी संपल्याने दि. १२/८/०५ पासून वि.अ. तत्वावर सेवासातत्य देण्यात येते. |
| ४] | कावेरी यजदानी बेगम सय्यद जहूर अहेमद | -"- | -"- | १३/९/२००६ पासून सेवासातत्य वि.अ. तत्वावर देण्यात येते. |

1. शाळेस मान्य करण्यात आलेल्या कर्मचारी अनुसूची आदेशाच्या अधिन राहूनच वेतन अदा करण्यात यावे, त्यापेक्षा जादा कर्मचाऱ्याचे वेतन अदा होणार नाही. याची खबरदारी घ्यावी. जादा वेतन काढल्यास संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. अन्यथा संस्थेच्या वेतनेतर अनुदानातून रक्कम कपात करण्यात येईल.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, जालना.**

प्रतिलिपी : 1) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
2) संबंधितास मुख्याध्यापका मार्फत..

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, जालना.**

C:\1My Documents\Tamboli\PRI-6\Approval.doc